**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार**
**अपंग व्यक्तींना शासकीय / निमशासकीय सेवेत**
**आरक्षण देऊन विशेष मोहिमेव्दारे पदे भरणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ९१ / सुधार -३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ८ ऑगस्ट, २०११.

**वाचा:-** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९९/प्र.क्र.३७/ ९९/१६-अ, दि.४ मार्च,२००२
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.न्याय-२००७/स.न्या./प्र.क्र.१०३ / (भाग-३)/१६-अ, दि. १९ ऑक्टोबर ,२००७
४) शासन परिपत्रक,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र -०६/ प्र.क्र. ९ / सुधार -३, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.
५) शासन निर्णय क्रमांक :- अपंग- २०१०/ प्र.क्र. १९४ / सुधार -३ दिनांक :- १७ मार्च, २०११.
६) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. ४ / सुधार -३, दिनांक :- २७ एप्रिल, २०११.
७) शासन परिपत्रक क्रमांक :- न्यायाप्र- २०११/ प्र.क्र. १२९/ सुधार -३, दि.४ ऑगस्ट, २०११

**परिपत्रक :-**

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम ३२ नुसार शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तींसाठी ३ टक्के एवढे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. सदर अधिनियमातील कलम ३३ नुसार शासकीय व निमशासकीय आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे सुनिश्चित करुन ती भरणे आवश्यक आहे. अपंगांसाठी आरक्षित असलेली तसेच अनुशेषाची पदे भरण्याची कार्यवाही वास्तविकतः जनहित याचिका क्र.३२९४/२०१० व इतर यावर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३० जून,२०११ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. याबाबत या विभागाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करुन सूचना दिलेल्या आहेत तरीही अपंगांची संपूर्ण पदभरती झालेली नाही. या न्यायालयीन प्रकरणावर मा. उच्च न्यायालयाने दि.५ ऑगस्ट,२०११ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी नाराजी व्यक्त केलेली आहे. आणि अपंग व्यक्तींसाठी आरक्षित असलेल्या पदांवर विशेष भरती मोहिम राबवून दि. ३० सप्टेंबर,२०११ पर्यंत अपंग व्यक्तींसाठी आरक्षित असलेली सर्व पदे भरण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

२. मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेऊन अपंगांसाठी आरक्षित असलेली अनुशेषाची रिक्त पदे विशेष भरती मोहिमे अंतर्गत भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम विभागांनी राबवावा.

i) अपंगांसाठी आरक्षित असलेल्या अनुशेषाच्या पदांवर भरतीसाठी जाहिराती दि. १५ ऑगस्ट, २०११ पर्यंत प्रसिध्द कराव्यात,

ii) आवश्यक असल्यास लेखी परिक्षा दि. १५ सप्टेंबर,२०११ पर्यंत घेण्यात याव्यात.

iii) पदांवर नियुक्तीसाठी मुलाखती घेणे व निवड प्रक्रिया दि.२५ सप्टेंबर,२०११ पर्यंत पूर्ण करावी.

iv) निवड झालेल्या सर्व उमेदवारांना नियुक्तीचे आदेश दि.३० सप्टेंबर,२०११ पर्यंत देण्यात यावेत.

३. वरील प्रमाणे कार्यवाही करताना संदर्भाधीन वाचा मधील अनु.३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१९ ऑक्टोबर,२००७ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे अपंगांसाठीचे आरक्षण हे सामाजिक आरक्षण नाही ही बाब विभागांनी विशेषत्वाने विचारात घ्यावी.

४. संवर्ग संख्येवर अपंगांच्या आरक्षणासाठी पदे निश्चित करताना संदर्भाधीन वाचा मधील अनु.७ येथील दि.४ ऑगस्ट,२०११ च्या परिपत्रकातील तरतुदी देखील विचारात घेण्यात याव्यात.

सर्व मंत्रालयीन विभागांनी हे आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुख, कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावेत आणि अपंगांसाठी आरक्षित असलेल्या अनुशेषाच्या पदांवर विहित कालावधीत पदभरती करण्यात यावी.

सदरहू शासन परिपत्रक शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेताक क्र. 201108091544436001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( रत्नाकर गायकवाड )
**मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन.**

प्रति :-
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
सर्व अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया बिल्डींग,हुतात्मा चौक,मुंबई (पत्राने )
सर्व विभागीय आयुक्त
आयुक्त,अपंगकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, वि.जा.भ.ज. व इ.मा.व. संचालनालय,पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
संचालक, समाजकल्याण अधिकारी,गट अ जिल्हा परिषद,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती-सुधार-३.